तानसा जलवाहिनीलगत आता सायकल ट्रॅक मुंबई पालिका ४५० कोटी खर्च करणार

■ मुंबई, प्रतिनिधी

मुंबई पालिका मोठ्या प्रमाणात प्रकल्प आखत आहे. आता पालिकेने आपले लक्ष सायकल ट्रॅककडे वळवले आहे. पालिका आता न्यायालयाच्या आदेशानुसार तानसा जलवाहिनीलगत १० मीटर रुंदीच्या परिसरात दुतर्फा असलेल्या झोपड्या हटवून हटवून निर्माण होणाऱ्या जागेत ३९ किमी.लांब 'जॉगिंग ट्रॅक' व 'सायकल ट्रॅक' उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्याहष्टीने पालिकेने जोरात कार्यवाही सुरू केली आहे. या सायकल ट्रॅकच्या प्रकल्पासाठी पालिका तब्बल ४५० कोटी रुपये खर्चणार आहे. तसेच या प्रकल्पासाठी पालिका 'व्यवस्थापन सल्लागार' नेमणार आहे. त्यासाठी सल्लागाराला १० कोटी ११ लाख रुपये खर्च करणार आहे. पालिका प्रशासनाने तानसा जलवाहिनी लगतच्या दुतर्फा असलेल्या झोपड्या हटविण्याची कारवाई सुरू केली आहे. त्यामुळे जलवाहिनी लगतची मोकळी होणारी ३९ किमी.ची दुतर्फा जागा आता 'जॉगिंग ट्रॅक' व 'सायकल ट्रॅक' यासाठी वापरण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. पालिका क्षेत्रात सुमारे ३९ किलोमीटर लांबीची तानसा जलवाहिनी आहे. या जलवाहिनीचा एक भाग हा मुलुंड ते धारावी असून दुसरा भाग घाटकोपर ते शीव असा आहे. ही जलवाहिनी पालिकेच्या टी, एस, एम पश्चिम, एन, एल, एफ उत्तर, के पूर्व, एच पूर्व, एच पश्चिम व जी उत्तर या १० प्रशासकीय विभागातून जाते.

गोवंडीत तरुणावर प्राणघातक हल्ला

मुंबई, प्रतिनिधी- उसने पैसे मागितले म्हणून एका २२ वर्षाच्या तरुणावर प्राणघातक हल्ला झाल्याची घटना गोवंडीच्या शिवाजीनगर, नटवर पारेख कंपाऊंड, म्हाडा वसाहत गेटजवळ काल घडली. या हल्ल्यात अनिल मेगा माली ऊर्फ वडेचा हा गंभीरीत्या जखमी झाला असून त्याच्यावर जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी मारेकरी आरोपीविरुद्ध शिवाजीनगर पोलिसांनी हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा नोंदविला आहे. अनिल हा फुगे विक्रेता असून तो सध्या उल्हासनगर येथील वेलकम गेटजवळील शांतीनगर, मिनाताई ठाकरे नगरात राहतो. काही दिवसांपूर्वी त्याने आरोपी तरुणाला उसने पैसे दिले होते, मात्र दिलेल्या मुदतीत त्याने पैसे परत केले नाही.

अखनूर सेक्टरमध्ये जोरदार चकमक २ पाकिस्तानी सैनिकांचा खात्मा

■ श्रीनगर

जम्मू-काश्मीरच्या अखनूर सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेवर आज भारतीय सैन्य आणि पाकिस्तानी सैनिकांमध्ये जोरदार चकमक उडाली. यात दोन पाकिस्तानी सैन्यांचा खात्मा करण्यात आला.

दरम्यान नियंत्रण रेषेवरील गावातील लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. अखनूर आणि पल्लनवाला नियंत्रण रेषेवर उशिरापर्यंत गोळीबार सुरू होता.

दहिसरच्या ठाकूर कॉलेजमध्ये ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती

■ मुंबई, प्रतिनिधी

पालिका क्षेत्रातील कचरा व्यवस्थापन अधिकाधिक प्रभावी व्हावे व कचऱ्याचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी पालिका प्रशासन सातत्याने सर्वस्तरीय प्रयत्न अविरतपणे करीत आहे. तसेच यासाठी विविध स्तरीय जनजागृती देखील नियमितपणे करण्यात येत आहे. पालिकेच्या या प्रयत्नांना पालिका क्षेत्रातील अनेक संस्था देखील सकारात्मक प्रतिसाद देत आहेत. याच अनुषंगाने दहिसर पूर्व परिसरातील 'ठाकूर रामनारायण कॉलेज ऑफ आर्ट्स अँण्ड कॉमर्स' या महाविद्यालयाच्या उपहारगृहात तयार होणाऱ्या ओल्या कचऱ्यापासून जैविकखत निर्मिती करणारी 'टंब्लर' पद्धतीची दोन यंत्रे नुकतीच कार्यान्वित करण्यात आली आहेत.

या प्रकल्पात प्रत्येकी ९० किलो यानुसार एकूण १८० किलो एवढी क्षमता असणारे दोन 'टंब्लर' (वैज्ञिष्ट्यपूर्ण प्रकारचे पिंप) बसविण्यात आले आहेत. यामध्ये दररोज कचरा टाकण्यात येणार

असून यामध्ये तयार होणारे खत हे साधारणपणे दर तीस दिवसांनी काढण्यात येणार आहे. या खताचा वापर महाविद्यालयाच्याच उद्यानांमध्ये आणि परिसरातील झाडांसाठी करण्यात येणार आहेत. कचऱ्यापासून खत निर्मिती करणारे १८० किलो क्षमतेची यंत्रे बसविण्याचा आवश्यक तो सर्व खर्च संबंधित महाविद्यालयाद्वारे करण्यात आला आहे.

वाडा-मनोर मार्गावर अपघात! दोन्ही चालक गंभीर जखमी

■ वाडा, प्रतिनिधी

वाडा - मनोर महामार्गावरील सापने गावाजवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या एका टेंपोने समोरून येणाऱ्या ट्रेलरला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला असून टेंपो चालक अंकित पासवान व ट्रेलरचा चालक दुनदून कुमार हे दोन्ही वाहन चालक गंभीरीत्या जखमी झाल्याने त्यांना अधिक उपचारासाठी ठाणे येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले आहे.

खामगावात २ तरुणांची मध्यरात्री निर्घृण हत्या

■ बुलढाणा

खामगाव शहरात आज मध्यरात्री दोन वाणज्याच्या सुमारास दोन तरुणांची चाकूने भोसकून आणि दगडाने ठेचून निर्घृण हत्या केल्याची घटना घडली. विशाल देशमुख (३२) व सचिन पवार (३३) अशी या हत्या झालेल्या तरुणांची नावे आहेत. रात्री दोन वाजण्याच्या सुमारास शहरातील शिवाजीनगर पोलीस स्टेशन हद्दीतील घाटपुरी नाका भागात दोघांचे मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळले. अवैध सावकारी आणि तरुणांच्या दोन गटांतील वादातून हे दुहेरी हत्याकांड घडण्याचा अंदाज व्यक्त होत आहे. याप्रकरणी एकाला अटक केली आहे.

विरार बोळिंजमध्ये पोलिसांसाठी म्हाडाच्या घरांची लॉटरी कधी?

■ मुंबई, प्रतिनिधी

विरार बोळिंजमध्ये म्हाडाच्या कोकण मंडळातर्फे पोलीस कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या घरांची लॉटरी २७ नोव्हेंबर रोजी काढण्यात येणार होती. पण काही कारणामुळे ही लॉटरी म्हाडाने पुढे ढकलली आहे. आता ही लॉटरी कधी काढली जाईल? असा प्रश्न विचारला जात आहे.

म्हाडान विनियम १३(२) अंतर्गत बोळिंजमध्ये म्हाडाची भव्य वसाहत आहे. यात इमारत क्रमांक १० मध्ये १८६ घरे पालघर ग्रामीण जिल्ह्यातील पोलीस दलातील कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत. या घरासाठी पोलिसांचे १०९ अर्ज म्हाडाकडे आले असून १८६ पैकी १०९ घरासाठी २७ नोव्हेंबरला लॉटरी काढण्याची अधिकृत घोषणा म्हाडा कोकण मंडळाचे सभापती बाळासाहेब पाटील यांनी केली होती.

लॉटरीसाठी म्हाडाने जय्यत तयारीही केली होती. पण प्रशासकीय अडचणीचे कारण पुढे करत म्हाडाने लॉटरी काढली नाही. आता घरांची लॉटरी कधी निघेल ? याकडे पोलीस अर्जदार डोळे लावून आहेत.

गिरगावातील ज्येष्ठ संगीत शिक्षक बळीराम पतंगे यांचे निधन

■ मुंबई

गिरगाव विभागातील सर्वांना परिचयाचे खेतवाडी विभागातील ज्येष्ठ संगीत शिक्षक गुरुवर्य बळीराम पतंगे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. वयाच्या ७ व्या वर्षापासून पतंगे मास्तरांनी संगीत कलेचे (तबला व संवादिनी) औपचारिक शिक्षण आपल्या बडील बंधू मा. दत्ताराम पतंगे यांच्याकडून घेतले. तसेच गुरू आर. जी. जोशी यांच्याकडे व्हायोलिन या वाद्याचे शिक्षण घेतले. गायन कलेचे शिक्षण नाना बोडस यांच्याकडून घेतले आणि तबल्याचे पुढील शिक्षण पंडित अण्णासाहेब थत्ते यांच्याकडून घेतले.

१९७७ या वर्षी त्यांनी आनंद बाल संगीत कला मंडळाची स्थापना केली. या मंडळातून मास्तरांचे अनेक विद्यार्थी विविध संगीत विषयात अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षेत विशारद परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. सर्वसामान्य लोकांपर्यंत आपल्या मंडळातील विद्यार्थ्यांची कला पोहवावी म्हणून पतंगे मास्तरांनी २००० साली स्वर - आनंद या वाद्यवृंदाची स्थापना केली. वयाच्या सातव्या वर्षापासून तबल्याची साथ करणाऱ्या पतंगे गुरुजी यांनी आपले अवघे आयुष्य संगीत क्षेत्राला वाहिले. हिराबाई बडोदेकरांपासून ते अनेक ज्येष्ठ-श्रेष्ठ गायकांना साथ करणारे पतंगे गुरुजी गेली अनेक वर्षे आबालवृद्धांना संगीताचे शिक्षण देत आहेत. अवघड कलेला अतिशय सोप्या पद्धतीने शिकविण्याचे कसब असलेल्या पतंगे गुरुजींनी आतापर्यंत अनेक गायक-वादक घडवले आहेत. २००२ या वर्षी अखिल भारतीय नाट्य परिषदेने पतंगे मास्तरांना प्रभाकर भालेराव स्मृती नाट्यसेवा गौरव पुरस्कार देऊन गौरविले होते.

महालक्ष्मीमध्ये मुंबई पालिका पशु वैद्यकीय रुग्णालय उभारणार

सुधार समितीत प्रस्ताव मंजूर

मुंबई, प्रतिनिधी- देशात सर्वात मोठी पालिका म्हणून गणल्या जाणाऱ्या मुंबई पालिका सेवा सुविधा पुरवत आहे मात्र या पालिकेचे मुंबईत पशु वैद्यकीय रुग्णालय नाही मात्र आता पालिकेने याकडे लक्ष केंद्रित केले असून पशु वैद्यकीय रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेतला आहे. महालक्ष्मी येथे पशु वैद्यकीय रुग्णालय पालिका उभारत असून पालिकेच्या अखत्यारीतील ते देशातील पहिले पशुरुग्णालय ठरणार आहे.

टाटा समूहातर्फे हे रुग्णालय उभारण्यात येत आहे तसा प्रस्ताव आज शनिवारी पालिका सुधार समितीमध्ये मंजूर करण्यात आला आहे त्यामुळे लवकरच हे रुग्णालय उभारण्यात येणार आहे. मुंबई पालिकेचे पशु वैद्यकीय रुग्णालय नाही तसेच देशभरातील कोणत्याही पालिकेचे स्वतःचे पशुवैद्यकीय रुग्णालय नाही. मात्र सर दोराबजी टाटा ट्रस्ट यांच्या माध्यमातून मुंबई पालिका पशु वैद्यकीय रुग्णालय उभारत आहे आणि देशातील पालिकांपैकी मुंबई महापालिकेचे हे पहिले रुग्णालय ठरणार आहे.

महालक्ष्मी येथे ऑर्थर रोड कारागृहाच्या मागे सुमारे ३६९१.४० चौ.मी. भूखंडावर पालिकेचे स्वतःचे श्वान नियंत्रण कार्यालय आहे. तेथे वेल्फेअर ऑफ स्ट्रे डॉग्ज या खासगी संस्थेचे प्राणी जनन नियंत्रण केंद्रही कार्यरत आहे.

पश्चिम रेल्वे

एलएचबी कोचेसच्या व्हील्सकरिता एडी करन्ट अँड (ईमीए) टेक्निक

निविदा सूचना क्र. : MI37/19 (BD15-ECA-2019), Dt. 20.12.2019 कामाचे वर्णन : ०१ वर्ष कालावधीकरिता कोचिंग डेपो बांद्रा टर्मिनस येथे एलएचबी कोचेसच्या व्हील्सकरिता एडी करन्ट अँड (ईमीए) टेक्निक. कामाचे अंदाजित मूल्य : ₹ ४१,१५,६४८/- (नीहाएरी सष्पत्ते), इतके ; ₹ ९९,९००/-, साप्ताहिकाच्या तारीख व वेळ : दि. २०.१२.२०१० रोजी दु. १५.०० वा., उघडण्याची तारीख व वेळ : दि. २०.१२.२०१० रोजी दु. १५.३० वा. अधिक माहितीसाठीः कृपया वेबसाइट www.ireps.gov.in ला भेट द्या. हाच प्रसाद विज्ञापन वेबसाईट जाणार नाहीत. 37

आम्हाला लाइक करा facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे

मेन फीडर केबलचे स्ट्रिपिंग व रिफिटिंग

निविदा सूचना क्र. : EL/WA/PL/2018-19/SO उप मुख्य विद्युत अभियंता (बां.), पश्चिम रेल्वे, बंदर लिंक बांद्रा, बंदरगाह, म. प्र. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३ हे खालील कामाकरिता अनुभवी कंत्राटदारांकडून ई- टेंडरिंगच्या माध्यमातून ई - बोली मागवीत आहेत. कामाचे वर्णन व त्याचे ठिकाण : कामाच्या व्यापीसुमार बायोटोयलेट्स प्रणालीच्या तसुरीकरिता कॉच एसी एलएचबी टाइप कोचेसच्या मेन फीडर केबलचे स्ट्रिपिंग व रिफिटिंग. परिमाण : १९३ कोचेस. ठिकाण : वसीत कार्यालयाच्या परवाच. कामाचे अंदाजित मूल्य : ₹ ९,५५,०००/- (₹ नऊ लाख पंचावन्न हजार मात्र). इतके ; ₹ १९,१००/- (₹ एकोणीस हजार शंभर मात्र). निविदा सादरीकरणाची अंतिम तारीख व वेळ : दि. १७.०१.२०२० रोजी दु. १२.०० पर्यंत. निविदा उघडणे : दि. १७.०१.२०२० रोजी दु. १२.३० वा. वेबसाइटवा तपशील : www.ireps.gov.in विविधकारणी याची नोंद घ्यावी की, पुढील कोणतेही शुद्धिपत्रक हे वेबसाइटवर अपलोड करण्यात येईल व विविधा ऑनलाइन सादर करण्यापूर्वी त्यानी त्याची नोंद घ्यावी. 43

आम्हाला लाइक करा facebook.com/WesternRly

५ जानेवारीला मुंबईत पालखी सोहळा व संत संमेलन

■ मुंबई

रविवार ५ जानेवारी रोजी श्रीराममंदिर कॉटन ग्रीन ते प्रतिपंढरपूर श्री विठ्ठल मंदिर, वडाळा, पांडुरंग पालखी सोहळा सलग २० व्या वर्षी श्री वारकरी प्रबोधन महासमिती (महाराष्ट्र) व्या वतीने संपन्न होणार आहे. पालखी सोहळ्याची सांगता दुपारी १ वाजता पाच ठाजन (फाईव्ह गार्डन) माटुंगा मुंबई येथे संतसंमेलनाने होणार आहे. या पालखी सोहळ्यास मुंबई, मुंबई उपनगरे तसेच बाहेगावाहून दिंड्या व हजारो भाविक, वारकरी या सोहळ्यात सहभागी होतात. १५ डिसेंबर रोजी झालेल्या सभेत महासमितीचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. श्री रामेश्वर महाराज शास्त्री यांनी सांगितले की, या पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक दिंडीस सांप्रदायिक वीणा भेट म्हणून दिला जाणार आहे. तसेच या पालखी सोहळ्यातील श्री वारकरी प्रबोधन समितीत नोंद होणाऱ्या दिंड्यांना व वारकऱ्यांना मानधन मिळण्यासाठी महासमिती प्रयत्न करणार आहे, असे शास्त्री महाराज यांनी जाहीर केले.

मुंबईत प्रथमच अभिनव 'स्ट्रीट लॅब' प्रदर्शन २३ व २४ डिसेंबर रोजी वरळीत सर्वांसाठी खुले

■ मुंबई, प्रतिनिधी

मुंबईकर नागरिकांना विविध नागरी सेवा सुविधा अव्याहतपणे देणारी आपली बृहन्मुंबई महानगरपालिका ही आपल्या क्षेत्रातील रस्ते सुरक्षा विषयक गुणवत्तापूर्ण व सकारात्मक सुधारणांसाठी सदैव कटिबद्ध आहे. याच कटिबद्धतेचा भाग म्हणून महापालिका आयुक्त प्रवीणसिंह परदेशी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'स्ट्रीट लॅब'च्या माध्यमातून पालिकेच्या इतिहासात प्रथमच 'रस्ते आरेखन स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या वैशिष्ट्यपूर्ण आरेखनांचे खुले व विनामूल्य प्रदर्शन येत्या सोमवारी व मंगळवारी, अर्थात २३ व २४ डिसेंबर २०१९ रोजी वरळी परिसरातील आचार्य अत्रे चौकाजवळ असणाऱ्या पालिकेच्या अभियांत्रिकीय संकुलात आयोजित करण्यात आले आहे. दोन्ही दिवशी सकाळी ११ ते सायंकाळी ५ पर्यंत खुल्या असणाऱ्या या प्रदर्शनात सर्वोत्कृष्ट ठरलेली रस्ता आरेखने बघण्याची व ते समजावून घेण्याची सुसंधी नागरिकांना उपलब्ध होणार आहे. तरी या प्रदर्शनास नागरिकांनी, नागरी सुविधांच्या अभ्यासकांनी व विद्यार्थ्यांनी आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन पालिका प्रशासनाद्वारे करण्यात आले आहे.

विक्रोळीत सद्गुरू हरिहर महाराज सेवा संघातर्फे आजपासून हरिनाम सप्ताह

■ मुंबई

ओम श्री सद्गुरू हरिहर महाराज सेवा संघातर्फे हरिहर महाराजांच्या ३० व्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त विक्रोळीतील टागोरनगरात रविवार २२ डिसेंबर ते रविवार २९ डिसेंबरदरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व विश्वशांती नाम जपयज्ञ आयोजित केला आहे.

या सोहळ्याचे मार्गदर्शक प.पू. ज्ञानेश्वर माऊली (सपकाळवाडी), प.पू. रामानंद महाराज (दसूरकर) हे आहेत. या सप्ताहात दररोज काकड आरती, श्रीची पूजा, आवाहन, भजन आरती, हरिपाठ, प्रवचन, कीर्तन, जागर असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. रविवार २९ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली (सपकाळवाडी) यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसाद वाटप आणि दिंडी मिरवणूक निघेल. तरी परिसरातील भाविकांनी या पारायण सोहळ्याचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन ओम श्री सद्गुरू हरिहर महाराज सेवा संघातर्फे करण्यात आले आहे.

जावळीतील अजिंक्य पाटीलने सुवर्ण पदक

सातारा, प्रतिनिधी - जावळवाडी ता. जावळी येथील अजिंक्य अशोक जवळ- पाटील याने कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात,वाशी येथील एन. सी. सी. परेडचे उत्कृष्ट नेतृत्व केल्याबद्दल त्याला सुवर्ण पदक देवून मान्यवरांचे हस्ते गौरविण्यात आले आहे. जावळी तालुका हा शुरांच्या वीरांचा आहे. देशासाठी लढताना वीर तुकाराम ओंबळे, नवनाथ सुर्वे, शशिकांत मोरे, रविंद्र धनावडे, सुरज मोहिते यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. हेच व्रत घेवून प्राथमिक शाळा जवळवाडी येथे शालेय शिक्षण घेणारा विद्यार्थी आज वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात एस.वाय.बी. कॉमचे शिक्षण घेत आहे.

तिलोरी कुणबी उत्कर्ष मंडळ, मुंबई
निवडी शितपवाडी, ता. जि. रत्नागिरी आयोजित
कानसे ग्रुप यांचे
बहुरंगी नमन
आकर्षक गण, शृंगारिक गौळण व ऐतिहासिक ज्वलंत वगनाट्य
हर हर महादेव
ले./दिग्दर्शक : संदिप कानसे
आज २२ डिसें.रात्री ८.३० वा. दामोदर हॉल,परेल
टि. संपर्क : दिनेश गावडे ९७६५६१२५४
वासुदेव पागेकर : ९६९१२०१४१४
योगेश शिंदे : ९७५७३३३३६६ टि. हि.हॉलवर संपूर्ण दिवस सुरु आहे

म नो रं ज न

खासदार गंभीरला जीवे मारण्याची धमकी

नवी दिल्ली- माजी क्रिकेटपटू आणि भाजपा खासदार गौतम गंभीर आणि त्यांच्या कुटुंबियांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. यासंदर्भात गौतम गंभीरनेच दिल्ली पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत त्याने स्वतःला आणि त्यांच्या कुटुंबियांना सुरक्षा पुरवण्यात यावी, अशी मागणीही केली आहे. भाजपा खासदार गौतम गंभीर हा क्रिकेटसह अनेक विषयांवर नेहमीच रोखठोक बोलत आल्याने चर्चेत राहिला आहे.

The Director General Of Police
Maharashtra State Police Headquarter,Shahid Bhagat Singh Marg, Colaba, Mumbai 400001
e-TENDER NOTICE

Maharashtra Police, invites Proposal from reputed and experienced companies to participate in the competitive bidding process of following e-Tender:-

Sr. No.	e-Tender No.	Item Description	Deadline
1	2224	Portable X-Ray Machine	24/12/2019

2. Tender submission will be made online. For detailed Tender documents, interested bidders may kindly visit https://mapo.maharashtra.etenders.in/tenders.

Sd/-
(Abhishek Trimukhe)
Asst. Inspector General of Police, (P.&C.)
For Director General of Police,
Maharashtra State, Mumbai

Place :- Mumbai,
Date :- 20/12/2019
डीजीआयपीआर २०१९/२०२०/४१८५

फॉर्म जी
स्वारस्याच्या अभिव्यक्तीचे आमंत्रण
(इन्सॉल्व्हन्सी ॲन्ड बँकरप्ट्सी (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोर ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ ए(१) अंतर्गत)

संबंधित विवरण

१.	कॉर्पोरेट ऋणकर्त्याचे नाव	जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड
२.	कॉर्पोरेट ऋणकर्त्याची संस्थापन दिनांक	०१ एप्रिल, १९९३
३.	कॉर्पोरेट ऋणकर्त्या संबंधित/नोंदणीकृत असलेले प्राधिकारी	कॉर्पोरेट कव्यवहार मंत्रालय, आरओसी, मुंबई
४.	कॉर्पोरेट ऋणकर्त्याचा कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर/लिमिटेड लायबिलिटी आयडेंटिफिकेशन नंबर	L99999MH1993PLC066213
५.	कॉर्पोरेट ऋणकर्त्याचा नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व मुख्य कार्यालय (असल्यास असल्यास)	नोंदणीकृत कार्यालय : सिरोया सेंटर, सहार एअरपोर्ट मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९९. विनियत कार्यालय : जेट एअरवेज (भारत) लिमिटेड, गरुडवाहन, सिराग मंजला, २५२, एलबीएस मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई- ४०० ०७०
६.	कॉर्पोरेट ऋणकर्त्याची दिवाळखोरी प्रारंभ दिनांक	दि. २० जून, २०१९
७.	स्वारस्याच्या अभिव्यक्तीचे आमंत्रण दिनांक	२२ डिसेंबर, २०१९ (२ वर्तमान) वर्तमान पत्रातील जाहिरात व कंपनीच्या आद्यपाठ वेबसाईटवर सुरुवात
८.	संहितेच्या अनुच्छेद २५ (२) (एच) अंतर्गत ठराव अर्जदारांसाठी पात्रता उपलब्धता	पात्रता आहेत www.jetairways.com. वर उपलब्ध विस्तृत स्वारस्याच्या अभिव्यक्तीमध्ये विहित आहे किंवा ती fly.JetAirways@in.gt.com येथे ई-मेल पाठवून प्राप्त करता येऊ शकेल.
९.	अनुच्छेद २९ ए अंतर्गत लागू आणावेचे निकष	आवश्यकीआणावी वेबसाइट (https://ibbi.gov.in/legal-framework/) वर उपलब्ध आहे किंवा ते fly.JetAirways@in.gt.com येथे ई-मेल पाठवून प्राप्त करता येऊ शकतील.
१०.	स्वारस्याच्या अभिव्यक्तीच्या स्वीकृतीची अंतिम तारीख	दि. ०९ जानेवारी, २०२०
११.	संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती सूची जारी होण्याची तारीख	दि. ०९ जानेवारी, २०२०
१२.	तात्पुरत्या सूचीवरील हरकती सादर करण्याची अंतिम तारीख	दि. १४ जानेवारी, २०२०
१३.	संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम सूची जारी होण्याची तारीख	दि. १७ जानेवारी, २०२०
१४.	संभाव्य ठराव अर्जदारांनाची माहितीचे ज्ञापन, मूल्यांकन निकष तसेच ठराव आराखड्याची विनंती सादर करण्याची तारीख	दि. ०९ जानेवारी, २०२०
१५.	ठराव आराखडा, मूल्यांकन निकष, माहिती ज्ञापन व पुढील माहिती प्राप्त करण्याच्या विनंतीचे स्वरूप	प्रारूप प्रस्तावित ठराव अर्जदारांना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पुरविण्यात येईल.
१६.	ठराव आराखडा सादर करण्याची अंतिम तारीख	दि. ०८ फेब्रुवारी, २०२०
१७.	ठराव अधिकाऱ्यांकडे ठराव आराखडा सादर करण्याचे स्वरूप	गोपनीयतेद्वे लिफाफ्यातून टपाल/खासटपाठवाद्वारे तसेच ठराव अधिकाऱ्यांना पेन ड्राईव्हमधून डिस्किटद्वे प्रतीसे देण्यात येईल.
१८.	मंजूरीकरिता निर्णय अधिकाऱ्यांकडे ठराव आराखडा सादर करण्याची अंतिम दिनांक	दि. १८ फेब्रुवारी, २०२०
१९.	ठराव अधिकाऱ्याचे नाव व नोंदणीकरण क्रमांक	अधिप्रत वयवसायिक IBBI/IPA-001/IP-P00294/2017-18/10538
२०.	बोर्डाकडे नोंदणीकरण केल्याप्रमाणे ठराव अधिकाऱ्याचे नाव, पत्ता व ई-मेल	अधिप्रत वयवसायिक पत्ता : ऑफ ओल्ड्स, १० मी हंगरफोर्ड स्ट्रीट, कोलकाता - ७०० ०१७. ई-मेल : ashish.chhawchharia@in.gt.com
२१.	ठराव अधिकाऱ्यांकडे पत्र व्यवहार करावयाचा पत्ता व ई-मेल	जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड, गरुडवाहन वन, ३ व मजला, २५२, एलबीएस मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०००७०, ई-मेल : fly.JetAirways@in.gt.com
२२.	पुढील तपशील उपलब्ध असण्याचे वा प्राप्त करण्याचे ठिकाण	कॉर्पोरेट ऋणकर्त्याची वेबसाइट : www.jetairways.com किंवा fly.JetAirways@in.gt.com येथे ई-मेल पाठवून प्राप्त करता येऊ शकेल.
२३.	फॉर्म जी प्रसिद्धी दिनांक :	२२ डिसेंबर, २०१९ (२ वर्तमान)

सही/-
अधिप्रत वयवसायिक
IBBI/IPA-001/IP-P00294/2017-18/10538
ठराव अधिकारी
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडकरिता
ई-मेल : fly.JetAirways@in.gt.com
आयबीबीआयकडे नोंदणीकृत पत्ता व ई-मेल आयडी
ऑफ ओल्ड्स, १० मी हंगरफोर्ड स्ट्रीट, कोलकाता - ७०० ०१७.
ई-मेल : ashish.chhawchharia@in.gt.com
दिनांक : २२ डिसेंबर, २०१९
ठिकाण : मुंबई